# जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कार्यालय.

Phone No .07132-222005, Fax 222022. Email. rdcgadchiroli@gmail.com


---

क्रमांक/कार्या-2/जि.ना./सं.क्र. /कावि/379 /2021 दिनांक - 26 / 03 /2021

**विषय :- जिल्हाधिकारी कार्यालयातील गाळे उपहारगृहासाठी भाड्याने देणेबाबत.**

## दरपत्रक सुचना.

जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली चे आवारातील गाळे दि. 31 मार्च 2022 पावेतो कालावधीकरिता उपहार गृहाकरिता खालील अटी व शर्तीचे अधिन राहून भाड्याने द्यावयाचे आहे. तरी बचत गट/कॅटरर्स/इच्छुकांनी आपले दरपत्रक फार्म दि. 7 एप्रिल, 2021 चे दु. 3.00 वाजेपर्यंत **तहसिलदार (आस्थापना), जि. का. गडचिरोली** यांचेकडे सादर करावेत. दि. 7 एप्रिल, 2021 ला दु. 4.00 वाजता उपस्थित दरपत्रक धारक यांचे समक्ष सिलबंद दरपत्रक उघडण्यात येतील.

## अटी व शर्ती

1) तहसिलदार (आस्थापना), जि. का. गडचिरोली यांचेकडे दरपत्रक दि. 7 एप्रिल, 2021 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यत त्यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. विहीत वेळेच्या नंतर प्राप्त होणारे दरपत्रके विचारात घेता येणार नाही.

2) यशस्वी दरपत्रक धारकास रुपये 1,000/- अनामत रक्कम रोख्याचे स्वरुपात रोखपाल, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचेकडे भरणा करावी लागेल सदरची अनामत रक्कम दिनांक 31 मार्च, 2022 पर्यंत ठेवण्यात येईल.

3) अधिक भाडे किंमत असलेली दरपत्रके जिल्हाधिकारी यांचेकडून अनुमती मिळाल्यानंतर स्विकृत करण्यांत येईल. तसेच चहा, अल्पोहार व जेवणासंबंधात ज्या दरपत्रक धारकाचे न्युनतम दर राहील त्यांना वाटाघाटी करणेबाबत संधी राहील.

4) उपहारगृहाकरीता भाड्याने देण्यात आलेल्या गाळ्याचे निश्चीत करण्यात आलेले मासिक भाडे आगावू स्वरुपात जमा करणे बंधनकारक राहील.

5) दरपत्रक मंजुर झालेल्या पुरवठाधारकास उपहारगृह/ गाळ्याचा ताबा एक महिण्याचे आगावू मासिक भाडे भरुन आदेशाचे तारखेपासून 7 दिवसाचे आंत घेणे बंधनकारक राहील. अन्यथा उपहारगृह चालविण्यास उत्सुक नसल्याचे समजुन दुसऱ्या व्यक्तिस गाळे भाडयाने देण्यात येईल.

6) दरपत्रके उघडल्यानंतर उपहारगृहाची नियोजीत किंमत न आल्यास किंवा इतर कारणास्तव दरपत्रक स्विकृत वा अस्विकृत करण्यांचे अधिकार जिल्हाधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

7) दरपत्रके उघडल्यानंतर उपहारगृहाची नियोजीत किंमत न आल्यास किंवा इतर कारणास्तव दरपत्रके स्विकृत वा अस्विकृत करण्यांचे अधिकार जिल्हाधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

8) कोरे दरपत्रक फार्मची किंमत रुपये 100/- रोखीने भरुन दरपत्रक रोखपाल शाखेतुन कार्यालयीन वेळेत दि. 7 एप्रिल, 2021 चे दुपारी 2.00 वाजेपर्यन्त प्राप्त करता येईल.

9) उपहारगृहाकरीता भाड्याने देण्यात आलेल्या गाळ्यांमध्ये ग्राहकांकरीता टेबल / खुर्च्या, तसेच विद्युत व्यवस्था, पाण्याची व्यवस्था इ. संपुर्ण व्यवस्था अर्जदारास स्वत: करावी लागेल. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या बाबतीत कोणतीही व्यवस्था करता येणार नाही.

10) उपहारगृहाची व परिसराची नियमीतपणे स्वच्छता ठेवणे बंधनकारक राहील. परिसरात दुर्गंधी पसरेल, अशा प्रकारचे वर्तन करता येणार नाही. कोणत्याही ग्राहकांशी तंटा / वाद इ. करता येणार नाही.

11) उपहारगृहात तंबाखुजन्य पदार्थ / धुम्रपान साहित्याची विक्री करता येणार नाही. असे आढळून आल्यास र. 500/- दंड तातडीने आकारण्यात येईल. व ते भरणे बंधनकारक राहील. असे कृत्य केल्यास तातडीने उपहारगृह बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल. व दुसऱ्या व्यक्तिस भाड्याने देण्यात येईल.

12) जिल्हाधिकारी कार्यालयात सभा किंवा ईतर कारणासाठी जेवण, चहा, कॉफी व नास्ता वाजवी दरात व तातडीने पुरविणे तसेच दरपत्रक फार्ममध्ये उक्त दर नमुद करणे बंधनकारक राहील. असे न झाल्यास तातडीने उपहारगृह बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

13) दुकाने अधिनियम (Shop Act) अंतर्गत नोंदणीची कागदपत्रे (प्रत) दरपत्रक फॉर्मसोबत जोडावी.

नि.उ.जि.

जिल्हाधिकारी गडचिरोली करिता.

प्रतिलिपी -

1. उप विभागीय अधिकारी / तहसिलदार गडचिरोली यांना माहितीस व उचीत कार्यवाहीस अग्रेषित. कृपया उपरोक्त दरपत्रक सुचना आपले कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावून प्रसिध्द करण्यात यावी व अहवाल सादर करावा.
2. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, गडचिरोली यांनी उक्त दरपत्रकबाबत अटी व शर्तीची प्रत तसेच दरपत्रक फॉर्मची प्रत **www.gadchroli.nic.in** वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी व तसा अहवाल सादर करावा.
3. लेखाधिकारी (अ.ले.प.) जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली
4. तहसिलदार (आस्थापना), जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली
5. नायब तहसिलदार (आस्थापना), जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली
6. जिल्हा नाझर, जि. का. गडचिरोली. वरील दरपत्रक सुचना कार्यालयीन बोर्डवर लावून प्रसिध्द करावी. व अहवाल सादर करावा.
7. रोखपाल, जि. का. गडचिरोली यांना माहितीस अग्रेषित.
8. श्री/श्रीमती/मेसर्स ------------------------------------------------------------

   यांना माहितीस अग्रेषित.

२६/३/१

नि.उ.जि.

जिल्हाधिकारी गडचिरोली करिता.